४

[illegible] /२००१
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक :

प्रति,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे ~~/सोलापूर/अहमदनगर~~
~~४. प्रशासन अधिकारी,~~
~~नगरपालिका/नपा./ प्राथमिक शिक्षण मंडळ [illegible] पुणे-१८ [illegible]~~

विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत, माध्यम : मराठी.

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक पीएसएस-१००० (५५७/२०००)/प्राशि-३, दिनांक ३० ऑगस्ट, २००१

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

अ.क्र.	संस्थेचे नाव	शाळेचे ठिकाण	माध्यम
१.	पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे	देहू रोड, जि. पुणे	मराठी

त्यामुळे या संस्थेकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या अभिप्रायासह १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावा. आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे/न देणे बाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळेसाठी एखादा शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारीत नमुन्यात अर्ज केला आहे व [illegible] शाळा [illegible] आहे.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक [illegible] सुरु [illegible] आहे.
८. संस्था [illegible] शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल. [illegible] रु. १००/- [illegible] भरता
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक [illegible] आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळा सुरु असलेले [illegible] विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करून मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय अन्य तुकडी संस्थेने जादा तुकडया संबंधीत संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा उघडणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेत परवानगी मागयाची आहे. त्यापूर्वी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पूर्वीच्या शाळा सुरु करणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एका वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही
~~[illegible] संस्थेकडून [illegible] प्राथमिक [illegible] संस्था [illegible] अधिकाऱ्याचा [illegible] करावयाचे [illegible]~~
१४. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. ([illegible] शैक्षणिक पात्रता)

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१ करिता.

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१. मा. उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा. शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, [illegible]

पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, ४८/१, [illegible], पुणे

[illegible] पुणे
24 OCT 2001
१३०४